प्रकरण पहिले

# ऐतिहासिक परंपरा व दक्षिण भारत जैन सभेची स्थापना

## प्रकरण पहिले

# ऐतिहासिक परंपरा व द. भा. जैन सभेची स्थापना

द. भारतातील जैनांच्या ऐतिहासिक परंपरेची सुरवात इ.स. पूर्व ३ ऱ्या शतकात म्हणजेच चंद्रगुप्त मौर्य यांच्या काळात झाली, असे सामान्यत: मानले जाते. सम्राट चंद्रगुप्ताने आचार्य भद्रबाहू यांच्या संघाबरोबर दक्षिणेत श्रवणबेळगोळ येथे येऊन सल्लेखनापूर्वक मरण स्विकारले; याचे उल्लेख श्रवणबेळगोळ येथील शिलालेखातून उपलब्ध होतात.[१] त्यामुळे इ.स. पूर्व ३ ऱ्या शतकापासून दक्षिण भारतात जैन धर्म प्रसारास चालना मिळाल्याचे दिसते. जैन धर्मिय ज्या ज्या प्रांतात राहिले त्या त्या प्रांतातील भाषांमधून त्यांनी साहित्यनिर्मिती केली. भगवान महावीरकालीन जैन वाङ्मय (आगमग्रंथ) प्राकृत, अर्धमागधी शौरसेनी या भाषातून आढळते तर, दक्षिणेत जैन धर्माचा प्रचार व प्रसार झाल्यावर कन्नड, तामिळ व मराठी भाषेमध्येही जैनांनी विपुल साहित्य निर्माण केले. जैन साहित्य धर्म, दर्शन, न्याय, काव्य, नाटक, कथा, शिल्प, वास्तू, आयूर्वेद या विषयावर उपलब्ध आहे. व्याकरण जोतिष्य, तर्कशास्त्र यामध्येही जैन साहित्यिकांनी आपला वेगळाच ठसा उमटविला आहे. तामिळनाडूमध्ये जन्मलेल्या श्री कुंदकुंदाचार्य या जैन गुरूंनी इ. सनाच्या पहिल्याच शतकात समयसार, प्रवचनसार, पंचास्तीकाय, नियमसार, अष्टपाहुड असे पाच महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहले. या ग्रंथाचे अध्ययन व विश्लेषण प्राकृत भाषेचे प्रकांड पंडित डॉ. ए. एन. उपाध्ये यांनी कोल्हापूरात २० व्या शतकात केले. त्यामुळे या सर्व धर्म ग्रंथांचे लिखाण व वाचन यातून दक्षिण भारतामध्ये घडलेला जैन समाज एकसंघ राहिला. दक्षिणेमध्ये पल्लवं, सातवाहन, चोळ, गंग, रठ्ठ, पाण्डच, इत्यादी राजवटीनी जैन धर्माला उदार आश्रय दिला. गंगवंशीय राजाचे सेनापती वीर चामूंडराय यांनी जगातील विशाल अशी भगवान

बाहुबलीच्या मुर्तीची स्थापना इ.स. ९८१ मध्ये श्रवणबेळगोळ येथे केली. राष्ट्रकुट काल हा दक्षिणेतील जैन धर्म प्रसाराचा सूवर्णकाल मानला जातो. १२ व्या शतकात होयसळ राज्याच्या स्थापनेत जैन आचार्य सुदत्त यांनी मार्गदर्शन दिले. विष्णूवर्धन राजाची राणी शांतलादेवी हिने अनेक जैन मंदिरे बांधून त्यांना दान दिल्याचे उल्लेख मिळतात. मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रात जैन अभ्यासकेंद्रे होती, तर भारतातील जैनांच्या लेणी, गुंफा मंदिरे यापैकी ७५% च्या वर एकट्या महाराष्ट्रात होती हे पुरातत्त्व शास्त्रज्ञांना आढळून आले आहे.[२]

कोल्हापूर, पैठण, शिरपूर, स्तवनिधी ही अतिथय क्षेत्रे तर कोल्हापूर, नांदणी, लातूर, कारंजा, नागपूर ही प्रमुख शहरे भट्टारक पिठांची केंद्रस्थाने म्हणून मध्ययुगीन काळापासून प्रसिद्ध आहेत. इ.स.च्या तिसऱ्या शतकातील सातवाहन राजवंशापासून कल्याणीचे चालुक्य, मान्यखेटचे राष्ट्रकुट, देवगिरीचे यादव, कोल्हापूर व कोकणचे शिलाहार या राजवंशानी मुघल अंमलापूर्वी जैन धर्माला आश्रय दिल्याचे उल्लेख मिळतात.[३]

जैन संस्कृतीचा दक्षिणेत विकास होत असताना अनेक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आव्हानांना तोंड द्यावे लागले. अल्पसंख्यांक जैनांनी धर्म, व्रते, पूजा पद्धती, आचार, विचार यांच्या माध्यमातून आपले स्वतंत्र अस्तित्व टिकविले आहे. जैन आचार्य, आर्यिका, श्रावक, श्राविका यांचा चतु:संघ आजही धर्मप्रभावणेचे कार्य करत आहे. त्यामुळे धर्माशी निगडीत सांस्कृतिक परंपरेचे जतन जैनांनी केल्याचे दिसून येते. प्राचिन काळापासून आजपर्यंत राजकारण, अर्थकारण, साहित्यशिल्प, मूर्तीकला, चित्रकला अशा विविध अंगांनी जैनांनी दक्षिणेतील समाजाला समृद्धी मिळवून देण्याचे कार्य केले आहे.

१३ व्या शतकापासून मुसलमानी अंमल सुरू झाल्याने आणि त्यानंतर ब्रिटीशांची सार्वभौम अधिसत्ता भारतात स्थिरावल्याने विविध धर्माच्या व जातीच्या समाज जीवनावर

वेगवेगळे परिणाम झाले. राजकीय फेरबदलाबरोबर धार्मिक व सामाजिक बदलही अपेक्षित होतेच १८१८ नंतर पेशवाईच्या अस्तामुळे महाराष्ट्रात स्थिरावलेल्या ब्रिटीश अंमलाचा परिणाम म्हणून १९ व्या शतकातील सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जैन समाजालाही मार्गक्रमण करावे लागले आहे. साहजिकच आधुनिकता व मध्ययुगीन धार्मिक संकल्पना यांच्या संघर्षातून वाटचाल करीत असताना जैन समाजावर १९ व्या शतकातील धार्मिक, सामाजिक व पुनुरूज्जीवनवादी चळवळीचा परिणाम झाल्याखेरीज राहिला नाही.

ब्रिटीश अंमलाखाली दक्षिण भारतात मुंबई इलाखा हा राज्यकारभाराचा व प्रशासनाचा महत्त्वपूर्ण घटक होता. मुंबई इलाखा सिंध ते कारवार इतका पसरला होता. या मुंबई इलाख्याचे सिंध, गुजरात, महाराष्ट्र आणि दक्षिण महाराष्ट्र असे प्रशासकीय विभाग होते. दक्षिण महाराष्ट्रात बेळगाव, कारवार, धारवाड, विजापूर, कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यांचा समावेश होत होता.

१९०१ च्या खातेसुमारानुसार भारतात १३,३४,०३९ इतक्या लोकसंख्येपैकी दक्षिण महाराष्ट्राच्या कोल्हापूर, सांगली आणि बेळगाव या जिल्ह्यात १,१३,००० इतकी लोकसंख्या एकवटली होती. तर १९७१ च्या खानेसुमारीनुसार वरील तीन जिल्ह्यात भारतातील जैनांच्या २६,०४,६४६ इतक्या लोकसंख्येपैकी २,६२,८५६ इतकी लोकसंख्या एकवटली होती. थोडक्यात कोल्हापूर, बेळगाव, सांगली या जिल्ह्याइतके लोकसंख्येचे एकत्रीकरण भारतातील दुसऱ्या कोणत्याही जिल्ह्यात आढळून येत नाही. म्हणजेच भारतातील एकूण जैनांपैकी १०% जैन दक्षिण महाराष्ट्राच्या या तीन जिल्ह्यात राहतात. या जिल्ह्यातील जैन हे प्रामुख्याने ग्रामीण भागात राहणारे आहेत. जैन लोक हे व्यापारी व शहरी भागात वास्तव्य करणारे सधन आहेत असा एक प्रवाद दिसून येतो. पण या तीन जिल्ह्यातील जैनांची लोकसंख्या प्रामुख्याने ग्रामीण भागात एकवटली आहे. बेळगाव जिल्ह्याचा उत्तर

भाग, कोल्हापूर जिल्ह्याचा पूर्व भाग, सांगली जिल्ह्याचा पश्चिम भाग यामध्ये राहणारे ग्रामीण जैन शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. त्यामुळे १९०१ च्या सुमारचा दक्षिण महाराष्ट्रातील हा जैन समाज बेळगाव जिल्हा सोडला तर प्रामुख्याने ब्रिटीश अंमलाखालील भागापेक्षा, कोल्हापूर, सांगली, मिरज इ. संस्थाच्या अंमलाखाली येणाऱ्या प्रदेशामध्ये वास्तव्य करून होता.[४]

कोल्हापूर संस्थानातील छ. शाहूंच्या कारकिर्दीत द. भारत जैन सभेच्या पहिल्या कोल्हापूर येथील वसतिगृहाचे सुरूवात १९०२ मध्ये झाली. त्यानंतर हे वसतिगृह द. भारत जैन सभा व तिच्या सर्व कार्याचे प्रमुख केंद्र बनले. त्यामुळे कोल्हापूर संस्थान छत्रपती शाहू महाराज व राजाराम महाराज यांचा द. भा. जैन सभेला असलेला पाठिंबा व आर्थिक मदत यावर दृष्टीक्षेप टाकणे अगत्याचे ठरते.

**कोल्हापूर संस्थान :** इ. स. १७१० मध्ये छत्रपती शिवाजी यांच्या स्नूषा व छत्रपती संभाजी यांच्या पत्नी महाराणी ताराबाई यांनी कोल्हापूर गादीची स्थापना केली. हे कोल्हापूर संस्थान ब्रिटीश कालखंडात स्वतंत्र संस्थान म्हणून १९४९ पर्यंत टिकून राहिले. छ. शाहू, छ. राजाराम व छ. शहाजी यांनी १९०१ ते १९४९ या कालखंडात कोल्हापूरच्या छत्रपती पदाची धुरा सांभाळली.

**छत्रपती शाहूंचे शैक्षणिक धोरण :** छ. शाहूंनी वयाच्या २० व्या वर्षी म्हणजेच इ.स. १८९४ मध्ये छत्रपतीपदाची सुत्रे हाती घेतली. इ.स. १८९४ ते १९२२ पर्यंतची २८ वर्षाची त्यांची कारकिर्द फक्त कोल्हापूर संस्थानच नव्हे तर महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारी ठरली. त्यांनी महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाच्या तत्वाचा अंगीकार करून ध्येयवादी दृष्टीकोनातून व नियोजनपूर्व केलेल्या बहुविध सुधारणेमुळे कोल्हापूर संस्थानातील सामाजिक जीवनात आमूलाग्र क्रांती घडून आली.

यासाठी त्यांनी प्रशासन, शेती, उद्योगधंदे, शिक्षण, आरोग्य आदि क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा घडविल्या. या सर्व सुधारणेमध्ये त्यांनी शैक्षणिक सुधारणांना अग्रक्रम दिला. अपेक्षित सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी आणि ते चिरस्थायी करण्यासाठी शिक्षण हे एक अत्यंत प्रभावी टॉनिक आहे. यावर त्यांचा नितांत विश्वास होता.[५] तसेच आपल्या प्रजेला प्रशासकीय यंत्रणेत सहभागी करून स्वयंशासन देण्याची त्यांची इच्छा फलद्रुप होण्यासाठी अशिक्षित मागासलेल्या शेतकरीवर्गातील प्रजेला शिक्षण देणे हा एकमेव मार्ग त्यांच्याकडे होता. त्यामुळे सर्वांगिण प्रगतीसाठी सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून व प्रशासकीय सुधारणा पूर्वीची अत्यावश्यक बाब म्हणून शिक्षण देण्यास छ. शाहूंनी अग्रक्रम दिला.[६]

छ. शाहू सत्तेवर येण्यापूर्वी पहिले शासकीय इंग्रजी हायस्कुल १८६७ मध्ये सुरू झाले पुढे हेच हायसकुल छत्रपती राजाराम हायस्कूल म्हणून प्रसिद्ध पावले व पुढे राजाराम कॉलेजमध्ये रुपांतरीत झाले.[७] १८७१ मध्ये मजूर, कारागिर व शेतकरी यांच्यासाठी रात्रीची शाळा सुरू केली होती.[८] कोल्हापूर संस्थानातील या शाळा लोकसंख्येची गरज भागविणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे वेगवेगळ्या स्तरावर शिक्षण संख्या स्थापन करून शिक्षण प्रसार करणे, शिक्षण घेण्याच्या मार्गातील अडचणी दूर होण्यासाठी विद्यार्थी वसतिगृहाची सुरवात करणे व संस्थानातील व संस्थानाबाहेरील शैक्षणिक संस्थांना आर्थिक अनुदान देवू करणे असा त्रिसूत्री कार्यक्रम छत्रपती शाहूंनी आखला.[९]

कोल्हापूरात चालू असलेल्या शिक्षण संस्थातून ग्रामीण शेतकऱ्याचा मुलगा येऊन शिक्षण घेणे ही अशक्य गोष्ट होती. पण पहिल्यांदा मॅट्रीक पास झालेला वारणा खोऱ्यातील पांडुरंग चिमणाजी पाटील हा विद्यार्थी मोठ्या हुद्यावर चढल्याचे स्वप्न छ. शाहूंनी पाहिले. पण हे स्वप्न पूर्ण होण्यासाठी त्यांची कोल्हापूरात राहण्याची सोय करणे अगत्याचे होते. त्याची चौकशी करता त्यांच्या हे लक्षात आले की कोल्हापूरच्या सर्व खानावळी ब्राह्मणांच्या

आहेत. ब्राह्मण सोडून सगळ्यांना तेथे आपल्या पत्रावळी उचलाव्या लागत व शेणगोळाही फिरवावे लागे. हे ऐकून छत्रपती व्यथित झाले. त्यासाठी काही होतकरू मराठ्यांची मुले राजवाड्यावर येऊन शिक्षणाच्या सोयी त्यांनी उपलब्ध करून दिल्या होत्या. पण त्यांचा हा प्रयोग फारसा यशस्वी झाला नव्हता. १८९७ साली झालेल्या दुष्काळावर मात करण्याच्या प्रयत्नात असलेल्या छत्रपती शाहूंच्या हे लक्षात आले की खानावळीचे दर दरमहा ५ रु. पासून ७ रु वर गेले आहेत. तेव्हा त्यांनी एक अभिनव योजना आखली. दरबारच्या वतीने एक वसतिगृह काढून दरमहा २ रुपये विद्यार्थ्यांकडून घेऊन जादा खर्च दरबारने द्यावयाचा. हे वसतिगृह सर्व धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू करून राजाराम कॉलेजला जोडले होते. तेथील अधिक्षक ब्राह्मण होते व ब्राह्मण विद्यार्थ्यांचीच संख्या अधिक होती. त्यांच्या इतर जातींना कमी लेखण्याच्या वृत्तीमुळे इतर जातीची मुले इथे प्रवेश घेण्यास धजेनात व घेतल्यास सोडून गेल्याचे सत्य छत्रपती शाहूंच्या नजरेत आले. त्यामुळे सर.डब्ल्यू.टी. मॉरिसन यांना लिहलेल्या पत्रात ते म्हणतात, ''जे वस्तीगृह मी सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यासाठी चालविले होते त्यात ब्राह्मणाखेरीज एकही विद्यार्थी आला नाही''[१०]

सामाजिक विषमतेमुळे उच्चभ्रु समाजाखेरीज इतरांचे शिक्षण अशक्य आहे हे जाणून या द्रष्ट्या राजकर्त्याच्या डोक्यात विचार चक्र सुरू झाले होते. गरीब ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांची राहण्याची, जेवण्याची व अभ्यासाची सोय समाधानकारक असल्याखेरीज त्यांचे शिक्षण होणार नाही यानंतर एक महत्त्वपूर्ण घटना त्यांच्या आयुष्यात घडली ती म्हणजे ते मुंबईला १८९९ मध्ये गेले असताना तिथे कोल्हापुरी फेटे बांधलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांना रस्त्यावर वाकून मुजरा केला. या कोल्हापूरकडील विद्यार्थ्यांची त्यांनी आस्थेने चौकशी केली. तेव्हा त्यांच्या हे लक्षात आले की कोल्हापूरकडील मुले शिक्षणासाठी हिराचंद गुमानजी जैन बोर्डींगमध्ये येऊन राहिली आहेत. त्यांचे वसतीगृह पाहण्याची इच्छा छ. शाहूंनी व्यक्त केली. त्याप्रमाणे त्यांनी मुंबई सेंट्रल येथील हिराचंद गुमानजी जैन बोर्डींगला भेट देऊन

१०००/- रुपयाची देणगी वसतिगृहासाठी देऊ केली. बोर्डिंगची हवेशीर जागा, भव्य वास्तू, सुसज्ज लायब्ररी, धर्म शिक्षण व्यवस्था विद्यार्थ्यांवरील देखरेख, गरीब विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्त्या इ. सोयी हिराचंद शेडजीनी वैयक्तीक स्तरावर पुरवलेल्या पाहून छत्रपतींना त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला. त्यांनी हिराचंद शेठच्या रत्नाकर पॅलेसलाही भेट दिली. त्या दोघांमध्ये स्नेहाचे संबंध निर्माण झाले. हिराचंद शेठ मुंबईतील प्रसिद्ध जव्हेरी असल्याने हे संबंध पुढे वृद्धींगत झाले. छ. शाहूंची हिराचंद गुमानजी बोर्डिंगला झालेली ही भेट कोल्हापूर दिगंबर जैन बोर्डिंगच्या स्थापनेच्या दृष्टीने शूभसूचकच होती.'' मुंबईहून परत आल्यावर त्यांनी दत्ताजीराव अमृतराव विचारे (कार्यकारी अभियंता) आणि भास्कर विठोजीराव जाधव (सरसूभे) ज्यांनी कष्टातून हिमतीने शिक्षण घेतले होते. अशा दोन अधिकाऱ्यांना बोलावून आपली वसतिगृह स्थापण्याची त्यांच्यासमोर कल्पना मांडली. त्याचबरोबर मुंबई इलाख्याचे शिक्षण संचालक ई. जाईल्स यांना १० ऑगस्ट १९०० रोजी लिहलेल्या पत्रात ते म्हणतात. ''मराठ्यांचे आचार विचार उच्च शिक्षणाला अनुकूल नाहीत, ब्राह्मणाच्या तुलनेत ते मागे पडतात त्यामुळे माझ्याकडील शिक्षण खात्यात मराठ्यांचे अर्ज क्वचित येतात.'' इंग्रजी शिक्षणाचे दरवाजे सर्वांना खुले झाले तरी बहुजन समाज अज्ञानाच्या अंध:कारात गटंगळ्या खात होता. राजाराम कॉलेजमध्ये पांडुरंग पाटील, साताऱ्याचे पी. के. शिंदे, एस. बी. जाधव आणि तासगांवचे आर. आर. पोवार यांनी पी. ई. च्या वर्गात नावे दाखल केली होती. या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी छ. शाहूंनी पन्हाळगडावर कचेरीच्या शेजारच्या श्री गुरुदेव दत्ताच्या देवळात मराठा वसतिगृहाचा प्रारंभ केला. या त्याच्या योजनेस त्याचे बंधू पिराजीराव घाटगे तथा बापूसाहेब महाराज, रघुनाथ सबनीस, भास्करराव जाधव, अमृतराव विचारे यांनी सर्वातोपरी सहाय्य केले. यातूनच १८ एप्रिल १९०१ रोजी राजनैतिक प्रतिनिधी सर डब्ल्यु. टी. मॉरीसन यांच्या हस्ते १८ एप्रिल १९०१ ला ''महाराणी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग इनस्टीट्यूशन'' या नावाने हे वस्तीगृह स्थापन केले. या वस्तीगृहातून मुलांच्या

अभ्यासासाठी सर्वतोपरी सहाय्य केले व २५ सप्टेंबर १९०१ ला वसतिगृहाच्या नवीन इमारतीचा पायाभरणी समारंभ छ. शाहूंनी मराठा एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षण प्रसारासाठी जयंती नाल्याजवळ जागा देऊ केला. या वसतिगृहाला स्थैर्य लाभावे म्हणून छ. शाहूंनी ४७,००० रुपयांपर्यंत देणगी दिली.[१२]

## दक्षिण भारत जैन सभेची स्थापना :

प्राचीन काळापासून धार्मिक, सामाजिक, साहित्यिक, आर्थिक क्षेत्रात समृद्ध असलेला भारतातील जैन समाज मध्ययुगीन कालखंडात आपले अस्तीत्व गमावून बसला होता. दक्षिण महाराष्ट्रातील प्राचीन परंपरा लाभलेल्या जैन समाजाची धार्मिक स्थिती खालावलेली होती. दीर्घकालीन मुसलमानी अंमलानंतर ब्रिटीशाची सार्वभौम अधिसत्ता भारतात प्रस्तापित झाल्याने विविध धर्मियांच्या व जाती जमातींच्या प्रभावाने जैन सामाजिक जीवनावरही दूरगामी परिणाम केले. गांवोगांवी असलेल्या जैनमंदिरात करावयाच्या पूजा, अर्चा, व्रते, उध्यापने इत्यादी धर्मविधी विषयी श्रावक, श्राविका अनभिज्ञ होते. जैनधर्मिय संस्कारविधी ही विसरले होते इतकेच नव्हे तर हिंदू, इस्लाम, पीर अशा अन्य देवदेवतांची पूजा करणे त्यांना नवससायास करणे, धार्मिक सण करणे इत्यादी अनेक गोष्टीत जैन श्रावक रममाण झाले. अर्थात जैन परंपरा ही वैदिक परंपरेला आवाहन आहे व इतर धर्माचे आचरण म्हणजेच मिथ्यात्व आहे, याची जाणीव श्रावकांना नव्हती. थोडक्यात जैन धर्म संस्कृती यांचा मुलभूत आधार असलेले जैन श्रावक हे धर्मज्ञान व धर्माचरण या पासून वंचित झाले होते. जैन उपाध्याय किंवा पुरोहित हे ही धर्मग्रंथाच्या अभ्यासापासून दुरावले होते. धर्मविधीतून आर्थिक फायदा एवढेच उद्दिष्ट त्याच्यापुढे होते. त्यामुळे मूर्तीचा अभिषेक, श्रावकांचे संस्कार विधी, मुनी संघाची व्यवस्था व भट्टारकांना मान देणे, इथेपर्यंतच जैन उपाध्यायाचे धर्मज्ञान उरले होते.

जैन चतू:संघ मुनी व आर्यिका आहाराच्या निमित्ताने श्रावकांच्या घरी जाऊन धर्मज्ञान व ज्ञानदानाचे काम प्राचीन काळापासून करत आले होते, मध्ययुगात ही परंपरा खंडीत झाली. त्यामुळे मूनी संघ व सामान्य जैन श्रावक-श्राविका यांच्यातील नाते दुरावले होते. मुसलमानी अंमलात निर्ग्रंथ मुनींनी विहार करणे अशक्य झाल्याने साधू व आर्यिका संघाची संख्या कमी झाली होती. त्यामुळे धर्मप्रचार, साहित्यनिर्मिती, श्रावकप्रबोधन याबाबत मुनी संघ कार्य करत नव्हते. यामुळेच जैन धर्म आणि तत्त्वज्ञान याची पकड जनमानसातून कमी होत चालली होती.[१३]

निर्ग्रंथ मूनीच्या विहारावर बंधने आल्याने मध्ययुगीन भारतात जैनमठ व मठाधिशांची संख्या निर्माण झाली होती. देशाच्या निरनिराळ्या भागात या भट्टारक संस्था होत्या व आपआपल्या भागातील जैन समाजाला धार्मिक प्रबोधन व मार्गदर्शन करण्याचे काम या संस्था करीत होत्या. कोल्हापूर संस्थानमध्ये श्री लक्ष्मीसेन भट्टारक कोल्हापूर व रायबाग आणि श्री जिनसेन थट्टारक नांदणी व कोल्हापूर अशी दोन भट्टारक पिठे कोल्हापूर संस्थानात होती; त्यांना परंपरागत जमिनी दान मिळाल्या होत्या. हे भट्टारक पंचकल्याणपूजा, धार्मिक विधी यावर नियंत्रण ठेवीत सामाजिक व आर्थिक अवनतीमुळे या भट्टारक पिठांचे कार्यही एकोणिसाव्या शतकात थंडावले होते.

धार्मिक व सामाजिक क्षेत्राप्रमाणे राजकीय क्षेत्रातही जैनांची स्थिती अत्यंत असमाधानकारक होती. परंपरागत पद्धतीने आलेल्या गांव पाटीलकीत समाधान मानून ग्रामीण वर्चस्वामध्येच जैन पाटील गुरफटले होते. त्यांना उच्च दर्जाच्या राजकीय आकांक्षा नव्हत्या. कारण तत्कालीन स्थितीत आवश्यक अशा शैक्षणिक अर्हता व साक्षरता यांचे अत्यल्प प्रमाण या समाजात होते.[१४]

१९०१ च्या शिरगणतीनुसार कोल्हापूर संस्थान सदर्न मराठा संस्थाने व बेळगांव जिल्हा या दक्षिण महाराष्ट्राच्या भागातील १,३०,००० जैनांमध्ये साक्षर पुरूषांचे प्रमाण फक्त १५% होते. म्हणजेच ८५% लोक निरक्षर होते. तर इंग्रजीच्या ज्ञानाच्या बाबतीत दुरावस्थाच होती. कोल्हापूर संस्थानातील २६,००० जैन पुरूषांपैकी ३७ आणि सदर्न मराठा संस्थानातील १४,००० जैन पुरषांपैकी फक्त १२ पुरूषांना इंग्रजी समजत होते. स्त्रियांची स्थिती याहून शोचनीय होती. २४,७२५ जैन स्त्रियांपैकी फक्त ५५ स्त्रिया तर सदर्न मराठा संस्थानातील १३,६७८ जैन स्त्रियांपैकी फक्त ३३ स्त्रियांना लिहता वाचता येत होते, तर जैन स्त्रियांमध्ये तर याच सालात या भागात इंग्रजी जाणणारी एकही स्त्री नव्हती. वरील आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की साक्षरता, शिक्षण या बाबतीत दक्षिण महाराष्ट्रातील जैन समाज मागासलेला होता.[१५]

## जैनांमधील जाती व पोटजातीचे प्राबल्य :

जैन समाज सामाजिकदृष्ट्या एकसंघ नव्हता तर अनेक जाती व पोटजातीमध्ये विभागला होता. त्यामुळे जातीद्वेष, कलहं व त्यातून समाजविघातक कृती यांना प्राधान्य मिळत असे. दक्षिण महाराष्ट्रातील जैनांमध्ये दिगंबर व श्वेतांबर या पंथापैकी दिगंबरांचेच प्राबल्य होते कारण श्वेतांबरपंथीय जैन व्यापाराच्या निमित्ताने गुजराथ, राजस्थान या भागातून येऊन दक्षिण महाराष्ट्रात स्थायीक झाले. दिगंबर जैन समाज चतुर्थ, पंचम, कासार, बोगारं, उपाध्याय, शैतवाळ या पोटजातीमध्ये विभागला होता. चतुर्थ समाज संख्येने अधिक असून ग्रामीण भागात शेती व्यवसायात गुतंले होते. नांदणी येथील चतुर्थ समाज, जिनसेन मठाचे भट्टारक श्री जिनसेन महाराज यांचे अनुयायी होते. पंचम समाजाचे व्यापारी, शहरात राहणारे व चतुर्थांच्या मानाने सुधारलेला होता. कोल्हापूरात प्रसिद्ध असलेल्या लक्ष्मीसेन मठाचे भट्टारक पट्टाचार्य लक्ष्मीसेन महाराज यांचे धार्मिक वर्चस्व या लोकांवर होते. कासार लोक

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

बांगड्याचा तर बोगार तांब्या पितळेची भांडी विकण्याचा व्यवसाय करत. हे लोक प्रामुख्याने बेळगाव, कोल्हापूर, सांगली या शहरात रहात व दक्षिण कर्नाटकातील हुम्मच या ठिकाणी असलेल्या देवेंद्र किर्ती भट्टारकांचे वर्चस्वाखाली असत. सैतवाल लोक हे प्रामुख्याने विदर्भ मराठवाडा विभागातून येऊन दक्षिण महाराष्ट्रतील शहरात येऊन वास्तव्य करीत मराठवाड्यातील लातूर मठाचे विशाल किर्ती भट्टारक हे त्यांच्यावर अधिसत्ता ठेवून होते. या सर्वापेक्षाही पौरोहित्य करणारे उपाध्याय हे लोक चतुर्थ व पंचम जातीत असत. त्यांच्यावर त्या त्या उपजातीतील भट्टारकांचे वर्चस्व असे. चतुर्थ पंचम हे संख्येने अधिक असल्याने त्यांचे वर्चस्व जास्त होते.[१६]

इतर समाजाप्रमाणेच जैन समाजातही जाती व रुढींचे प्राबल्य होते. मध्ययुगीन राजकीय अस्थिरता, सामाजिक एकतेचा अभाव यामुळे इतर धर्मियांच्याप्रमाणेच १९ व्या शतकाच्या सुरवातीच्या जैन समाज ही रुढी आणि परंपरा यांच्या वर्चस्वाखाली होता. त्यांना बालविवाह, जरठबालाविवाह, पाटाची चाल, कन्या विक्रयं, काडीमोड होणे यासारख्या स्त्रिविषयक अनेक रूढी व परंपरा यामध्येच जैन समाज गुरफटला होता. आपआपल्या असणाऱ्या भट्टारकांचे वर्चस्व यामुळे जाती उप जातीतील तेढ वाढूण जैन समाजातील एकसंघता लोप पावली होती.[१७]

वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यास हे सहजपणे जाणवते की इतर समाजाप्रमाणेच जैन समाजही शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला होता. जैन स्वत:ला उच्च समजत असले तरी सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने ते उन्नत अवस्थेत होते असे दक्षिण महाराष्ट्राच्या संदर्भात तरी म्हणता येत नाही. साहजीकच इतर समाजाप्रमाणे आपल्या राज्यातील जैन समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीकडे छत्रपती शाहूंनी आपले लक्ष वळवले.[१८]

डच, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्लिश या परकीय सत्ता व्यापाऱ्याच्या निमित्ताने भारतीय किनाऱ्यावर येऊन स्थिरावल्यावर त्याच्याशी सर्व समाजाचा संबंध आला. डच पोर्तुगिजप्रमाणे त्यांच्या धर्मांतराची जबरदस्ती ब्रिटीश सरकारने सुरवातीला केला नसली तरीही १८१३ च्या सनदी कायद्याने ख्रिश्चन धर्मगुरूंना भारतात धर्मप्रसारास परवानगी मिळाली. त्यामुळे ख्रिश्चन धर्मगुरूंनी वैद्यकीय मदत, शिक्षण, अनाथालये इत्यादी मार्गाने गरीब व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या भारतीयांच्यावर ख्रिश्चन धर्माची पकड घट्ट करण्यास सुरूवात केली. ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणामुळे नाडलेल्या भारतीय व आंग्लशिक्षित भारतीय यांना ख्रिश्चन धर्माच्या सरळ सोप्या तत्वज्ञानाचे आकर्षण वाटू लागले. यातूनच ख्रिस्ती धर्माच्या आक्रमणामुळे आपला धर्म बुडतो की काय अशी शंका प्रत्येक धर्मीय भारतीयांच्या मनात उदय पाऊ लागली.[१९]

इंग्रजी शिक्षणाचे परिणाम १८ व्या शतकाच्या मध्यात जाणवू लागले होते. १७५७ ला प्लासीच्या लढाईने भारतीय प्रशासनात स्थान मिळविलेली इस्ट इंडिया कंपनी १८५७ च्या दरम्यान चांगलीच स्थिरावली होती. त्यामुळे १८५७ च्या बंड संपल्यानंतर राणीचा अंमल भारतात सुरू झाला. या सर्वच राजकीय व धार्मिक बदलाचा परिणाम १९ व्या शतकामध्ये भारतात दिसून येतो. त्यामुळेच धार्मिक, सामाजिक पुनरुज्जीवनवादी चळवळींना भारतात सुरूवात झाली.[२०] इ.स. १८२८ मध्ये पहिली सामाजिक व धार्मिक चळवळ म्हणून ब्राह्मो समाजाच्या स्थापनेला महत्त्व द्यावे लागते. ब्राह्मो समाजाच्या वैचारिक क्रांतीतूनच १८६७ ला आत्माराम, दादोबा व भास्कर या तीन तर्खडकर बंधूच्या प्रयत्नाने व डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती रानडे यांच्या प्रयत्नाने प्रार्थना समाजाची महाराष्ट्रात स्थापना झाली पेशवाईपासून स्थिरावलेल्या ब्राह्मणी वर्चस्वाला शह देणारा सत्यशोधक समाज १८७३ मध्ये महात्मा जोतिबा फुले यांनी पुण्यात स्थापन केला. हिंदू धर्मातील सनातन विचारांना उजाळा देण्यासाठी आणि हिंदू धर्माच्या पुनरुज्जीवनासाठी स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य

समाजाची स्थापना केली.[२१] या सर्व घडामोडींचा परिणाम जैन समाजावर कळत नकळत होत होता. इतर धर्माच्या आक्रमणापासून जैन संस्कृती, तिर्थक्षेत्रे, मंदिरे, ग्रंथ भांडारे यांचे रक्षण करणे व धर्मप्रणित आचारास समाजाला प्रवृत्त करणे या जाणिवेने मथुरा या तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी १८९० ला भारतवर्षीय दिगंबर जैन महासभेची स्थापना झाली.[२२] त्यांनी सुरू केलेल्या 'जैन गॅझेट' या मुखपत्रातून नवविचाराचे वारे भारतभर पसरले. याचा परिणाम म्हणूनच १८९५ ला मुंबई प्रांतीय दिगंबर जैन सभेची सुरवात शेठ माणिकचंद पानाचंद जव्हेरी यांच्या प्रेरणेने सुरू झाली. त्यांनी सुरू केलेल्या जैन मित्र या वृत्तपत्रातून जैनांना एकत्र येण्याचा संदेश मिळाला. हे विचार सोलापूर शहरात 'जैनबोधक' या वृत्तपत्राद्वारे शेठ हिराचंद नेमचंद जोशी यंनी पोहचविले.[२३]

या प्रभावाने कोल्हापूर जिल्ह्याच्या हातकणंगले तालुक्यातील कुंभोज येथील काही कार्यकर्त्यांनी १८८८ ला सध्दर्ममंडळ ही संस्था स्थापन करून तर १८९३ मध्ये श्री लक्ष्मीसेन भट्टारक यांनी मोती कोल्हापूर मठात पंडितांच्या नऊ मुलासाठी पाठशाळा सुरू केली. कुंभोज कोल्हापूर येथील प्रयोग फारसे यशस्वी झाले नाहीत तरी आसपासच्या कार्यकर्त्यांना नव विचाराची दिशा मिळाली.

छत्रपती शाहूच्या वैचारिक प्रगल्भतेने कोल्हापुरात शिक्षणाच्या अनेक सोयी उपलब्ध झाल्या होत्या. त्यामुळे माध्यमिक अथवा उच्च शिक्षणाकरिता खेड्यातील शेतकरी समाजातील विद्यार्थ्यांना कोल्हापुर, पुणे, मुंबई इकडे जावे लागत होते या सधन शेतकऱ्यांच्या मुलांनी इंग्रजी शिक्षण घेऊन एका वैचारिक चळवळीस जैन समाजात जन्म दिला. या वैचारिक प्रगल्भतेतूनच विशाळी अमावस्येच्या वेळी पुणे-बेंगलोर रस्त्यावरील निपाणी जवळील स्तवनिधी येथील दरवर्षी भरणाऱ्या विशाळी अमवस्येदिवशी जमणाऱ्या लोकांच्या संघटनेचा विचार रुजवावा या हेतूने निपाणीच्या आसपासच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न

सुरू केले.[२५] स्तवनिधी क्षेत्र कमिटीमध्ये सर्वश्री तवनाप्पा रामचंद्राप्पा सन्माने (हलकर्णी), आण्णा नारायण आवटी (आजरा), बाबासाहेब तवनाप्पा अवलक्की व तवनाप्पा गोगजे (बेळगाव), भाऊराव पाटील (यमकणमर्डी), शांताप्पा सखाराम जिरगे (कोल्हापूर) यांनी उत्तर भारतातील जैनांप्रमाणेच दक्षिण महाराष्ट्रातील जैनांच्या संघटनेसाठी एक मध्यवर्ती संस्था असावी असा विचार मांडला. याचवेळी आणखीन एक घटना घडली. सर्वश्री आण्णा हजे, भा. स. पाटील हे शिखरजीच्या यात्रेस गेले असताना उत्तरेकडील जैन कार्यकर्त्यांना भेटले. त्यांच्याकडून मिळालेल्या मार्गदर्शनाने तेही लोक स्तवनिधीच्या क्षेत्र कमिटीच्या कार्यात सहभागी झाले. ३ एप्रिल १८९८ च्या विशाळी अमावस्येच्या यात्रेस येणाऱ्या लोकांच्यामध्ये हा विचार रुजवून द. भारत जैन समेच्या स्थापनेचा विचार पक्का केला.[२६] सभेच्या रायबागचे महालकरी श्री पाटील हे या परिषदेला जाणार होते पण छत्रपती शाहूंचा मुक्काम रायबागला असल्याने ते या परिषदेला जाण्यास धजेनात तेव्हा महाराजांनी त्यांना सांगितले तुम्ही परिषदेस मुद्दाम जा आणि परिषदेच्या नेत्यांना सांगा की तुमच्या सामाजिक कार्यात विशेषता शिक्षण प्रसाराच्या कार्यात माझी सहानभूती आहे.

या स्तवनिधीतील परिषदेस आण्णा बाबाजी लठ्ठे व आण्णा फड्याप्पा चौगुले या दोघांनी भाग घेतला. हे दोघेही हिराचंद गुमानजी जैन बोर्डिंगमध्ये राहून आपले कॉलेजचे शिक्षण पूर्ण करत होते. छत्रपती शाहूंना त्यांनी प्रथम १८९९ बोर्डिंगमध्ये नेले होते. आण्णासाहेब लठ्ठे यांनी या परिषदेत एक ठराव मांडला की, "ही परिषद दक्षिण महाराष्ट्रातल्या जैनांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करेल म्हणून तिचे नाव दक्षिण भारत जैन सभा असे असावे." या सभेमध्ये चौगुले यांनी स्वतंत्र पाठशाळा काढण्याचा विचारही मांडला व तो सर्वामध्ये मान्य करण्यात आला. या परिषदेचे दुसरे अधिवेशन २० जाने १९०० मध्ये स्तवनिधीमध्ये भरले आणि घटना तयार करण्यासाठी, शिक्षणासाठी पैसे गोळा करण्यासाठी, जैन धार्मिक प्रशासनासाठी स्वतंत्र कमिट्यांची नेमणूक झाली. १९०५ च्या अधिवेशनामध्ये

शिक्षणाच्या प्रगतीने जैन समाजाची प्रगती व्हावी यासाठी श्री लट्ठे यांना विद्या विभागाचे प्रमुख केले.[२७] याच अधिवेशनामध्ये शिक्षणाचा प्रसार त्यासाठी शिक्षण फंड गोळा करणे व स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य देण्याचे मान्य करण्यात आले. तसेच सभेच्या कार्याला संघटनात्मक रूप येण्यासाठी कामकाजाविषयक नियम तयार करून सभेची घटना तयार करण्याचे ठरविले. त्याचा मसूदा ही १९०७ मध्ये तयार केला गेला. या नियमात त्यामध्ये १९१४ साली काही दुरूस्त्या झाल्या व त्यानुसार द. भा. जै. सभेचे कामकाज १९६२ सालापर्यंत चालले. या काळात सभेच्या कार्याची व्याप्ती वाढत राहिल्याने १९६३ पासून नवीन घटना दुरूस्तीसह अंमलात आली व पूर्वीच्या ५ जिल्ह्याचे कार्यक्षेत्र असणाऱ्या सभेचे नांव दक्षिण भारत जैन सभा असे बदलण्यात आले.[२८] सभेच्या सर्व नियमाबरोबरच वसतिगृहांसंबंधी व स्कॉलरशीपसंबंधी काही नियम प्रथमपासूनच करण्यात आले. दक्षिण भारत जैन सभेच्या घटनेत सर्वसाधारण नियम १ ते १६ असून १७ ते २३ स्कॉलरशीपसंबंधी व २४ ते २७ वसतिगृहासंबंधीचे नियम बनविले होते.[२९] ते पुढीलप्रमाणे -

**स्कॉलरशीपसंबंधी नियम :**

१७) कोणत्याही वर्षी स्कॉलरशीपसाठी किती रक्कम वाटणेत यावी याचा अधिकार मध्यवर्ती कार्यकारी मंडळास राहील.

१८) सरकारी नियमाप्रमाणे, शिक्षणक्रमाचे निकाल जाहीर झाल्यानंतर, थोड्याच अवधीत संस्थेतर्फे वाटण्यात येणाऱ्या स्कॉलरशीपची माहिती, संस्थेच्या वृत्तपत्रातून जाहीर करून स्कॉलरशीप मागणीचे अर्ज मागवावेत. सदरच्या अर्जाचा विचार मध्यवर्ती कार्यकारी मंडळाने करून निर्णय घ्यावा.

१९) चालू पद्धतीप्रमाणे संस्थेच्या शाखेचा स्थानिक मंडळाने त्या शाखेस उपलब्ध असणाऱ्या अगर येणाऱ्या पैशातून योग्य त्या विद्यार्थ्यास स्कॉलरशीप देण्याचे ठरवून त्यांच्या मंजुरीकरिता मध्यवर्ती कार्यकारी मंडळाकडे रिपोर्ट करावा.

२०) समाजाची जरुरी व देशाच्या एकंदर परिस्थितीचा विचार करून कोणत्या शिक्षणक्रमास किती महत्त्व द्यावयाचे हे मध्यवर्ती कार्यकारी मंडळाने ठरवावे व त्याप्रमाणे निरनिराळ्या शिक्षणक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कमी जास्त मदत देण्याचे ठरवावे.

२१) स्कॉलरशीप रक्कम वाटपासंबंधी मध्यवर्ती कार्यकारी मंडळाने घेतलेले सर्व निर्णय अखेरचे समजणेत येतील.

२२) दिलेल्या मुदतीत स्कॉलरशीप रक्कम पूर्ण लवकर परतफेड व्हावी या दृष्टीने मदत मागणाऱ्या विद्यार्थ्याकडून तो सज्ञान असल्यास त्याचे अगर त्याच्या पालकाकडून कायदेशीर कागद म्हणून जरूर त्या शर्तीचा बॉण्ड संस्थेच्या नावे लिहून घ्यावा. शिवाच सदर सज्ञान विद्यार्थ्याने व त्यांच्या पालकाने स्कॉलरशीप म्हणून घेतलेल्या रक्कमेच्या परतफेडीच्या हमीबद्दल २ लायक जामीन घ्यावेत व त्या जामीनाकडून संस्थेच्या नावाने जरूर त्या शर्तीचे जामीन कसबे लिहून घ्यावेत.

२३) स्कॉलरशीप मागणीच्या अर्जाचे नमुने व परतफेडीसाठी घेण्यात येणाऱ्या शर्तीचे बॉण्ड अगर जामीन कसबे वगैरेसंबंधी मध्यवर्ती कार्यकारी मंडळाने जरूर ते नमुने साईजप्रमाणे तयार करावी.

**वस्तीगृहासंबंधी नियम :**

२४) या संस्थेच्या वस्तीगृहात राहणारा प्रत्येक विद्यार्थी, तो सज्ञान असल्यास त्याने व अज्ञान असल्यास त्याचे पालकाने प्रगती आणि जिनविजयाचे वर्गणीदार झालेच पाहिजे.

२५) संस्थेच्या वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी धार्मिक शिक्षण घेतले पाहिजे. त्यासाठी मध्यवर्ती कार्यकारी मंडळाने अगर वस्तीगृहाच्या स्थानिक मंडळाने जरूर ती धार्मिक शिक्षणाची सोय करावी.

२६) संस्थेच्या प्रत्येक वसतिगृहात ग्रंथालय ठेवावे.

२७) संस्थेच्या वस्तीगृहातील विद्यार्थी हे आपल्या शिक्षणक्रमात वरच्या दर्जात उत्तीर्ण व्हावेत यासाठी त्यांना मदत म्हणून स्थानिक मंडळांनी जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा चांगले पगारी शिक्षक नेमून, विद्यार्थ्यांचे शारिरीक, शैक्षणिक व धार्मिक प्रगतीचे वाढीस जास्तीत जास्त अनुकूल होईल व जैन धर्माच्या संस्कृती अनुसारं त्यांच्या आचार विचारास घडण व स्वास्थ्य मिळेल. अशा तऱ्हेची असावी त्या दृष्टीने जरूर ते नियम व व्यवस्था त्या त्या स्थानिक मंडळाने जरूर पडल्यास मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या मार्गदर्शनाने करावी.

सभेच्या घटनेमध्ये स्कॉलरशीप व वसतिगृहासंबंधी नियम केल्याने सभेच्या कार्यकर्त्यांना व पदाधिकाऱ्यांना त्यानुसार कार्यवाही करणे पुढील कालखंडात शक्य झाले. सभेच्या घटनेने प्रत्येक गोष्टीवर बारीक लक्ष देऊन स्कॉलरशीपची जबाबदारी विद्यार्थ्याबरोबर परतफेडीकरिता त्याच्या पालकांवरही टाकली. गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आर्थिक जबाबदारी घटनेनुसार संस्थेने उचलली असली तरीही त्याच्या परतफेडीची जबाबदारी कर्तव्य म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यावर टाकली जाते. विद्यार्थ्यांने आपले

शिक्षण पूर्ण करून अर्थार्जन सुरू केल्यावर स्कॉलरशीपची परतफेड करणे ही त्याची नैतिक जबाबदारी मानली जाते.

१९ व्या शतकाच्या शेवटच्या वर्षात द. भारत जैन सभेची स्थापना होऊन (१८९९) सभेने पुढील पाच वर्षात ठोस कार्यवाहिला सुरूवात केली. २० व्या शतकात विद्यार्थी वसतिगृहे यांची केलेली स्थापना व वाढ, महिला शिक्षणासाठी श्राविकाश्रमाची केलेली स्थापना व वाढ ही दक्षिण भारत जैन सभेच्या कार्याचे फलित मानावे लागेल. १९ व्या शतकात शैक्षणिक सामाजिक व धार्मिक दृष्टीने मागासलेल्या जैन समाजाला द. भारत जैन सभेच्या रुपाने मार्गदर्शक नेतृत्त्व मिळाले. सभेच्या सर्व कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा न करता एक सामाजिक कार्य म्हणून भारत जैन दक्षिण भारत जैन सभेच्या कार्यात सहयोग दिला.

दक्षिण भारत जैन सभेची नोंदणी सोसायटी रेजिस्ट्रेश ॲक्ट १८६० प्रमाणे दिनांक ९/३/१९०८ रोजी करण्यात आली. आज द. भारत सभेतंर्गत १) बाबगौडा भुजगौडा पाटील, प्रकाशन मंडळ, २) वृत्तपत्र प्रकाशन मंडळ, ३) देवस्थान मंडळ / श्रीक्षेत्र कमिटी, ४) दक्षिण भारत जैन महिला परिषद, ५) विद्यार्थी वसतिगृहे, ६) श्राविकाश्रम, ७) वीर सेवा दल, ८) वीर महिला मंडळ, ९) पदवीधरांची संघटना इत्यादी उपशाखा म्हणून सभेतंर्थत कार्यरत आहेत. सभेचे कार्यक्षेत्र दक्षिण महाराष्ट्राबरोबरच मुंबई, पुणे, मराठवाडा, इत्यादी ठिकाणी विस्तारले आहे.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१) चित्राव सी.व्ही., भारत वर्षिय मध्ययुगीन चरित्र कोष, १९३७, पृ. ३६३.

२) डॉ. पद्मजा पाटील, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास (१९७६-२०००) अप्रकाशित संशोधन प्रकल्प, द. भा. जैन सभा सांगली, २००२, पृ. ५.

३) कित्ता, पृ. ६.

४) डॉ. संगवे विलास, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास १८९९-१९७५, दक्षिण भारत जैन सभा सांगली, १९७६, पृ. १२ ते १४.

५) डॉ. रवणे बी. डी., श्री शाहू : सामाजिक व राजकीय सुधारणांचा अभ्यास (१८८४-१९२२) अप्रकाशित पीएचडी प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७८, पृ. १४४.

६) कित्ता, पृ. १४५.

७) श्री बकुळ भोसले, राजाराम कॉलेजचा इतिहास (१८८०-१९५०) अप्रकाशित एम. फिल शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९०, पृ. १-३.

८) कोल्हापूर स्टेट, ॲडमिनस्ट्रेटिव्ह रिपोर्ट, १८९३-९४, पृ. १४२.

९) डॉ. संगवे : राजर्षी शाहू महाराजांचे अभूतपूर्व शिक्षण कार्य : व्याप्ती व फलश्रुती, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ संपादक, डॉ. जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर २००१, पृ. ५९१.

१०) कोल्हापूर स्टेट ॲडमिनस्ट्रेटिव्ह रिपोर्ट, १८९६-९७; सूर्यवंशी कृ. गो. राजर्षी शाहू राजा व माणूस, ढोकळ प्रकाशन पुणे, आवृत्ती १ ली फेब्रुवारी १९८४ पृ. १३१-१३२.

११) बा. शा. मूडबिद्रीकर, माणिकचंद हिराचंद जव्हेरी यांचे जीवनचरित्र व. भू. पाटील ग्रंथ प्रकाशन मंडळ सांगली, १९९८, पृ. २२.

१२) लट्ठे, ए. बी., छ. शाहू महाराजांचे चरित्र १९२५, पृ. १३९.

१३) डॉ. विलास संगवे, उपरोक्त पृ. २०-२२

१४) श्री. धनपाल हेरवाडे, अप्रकाशीत लेखसंग्रह २००४, सांगली.

१५) प्रगती आणि जिनविषय, १९२३, पृ. ५.

१६) डॉ. संगवे विलास, 'जैन कम्युनिटी ए सोशल सर्व्हे' पॉप्युलर प्रकाशन मुंबई, सुधारीत दुसरी आवृत्ती, पृ. ९२-९९.

१७) प्रगती आणि जिनविषय, दक्षिण भारत जैनसभेचे मुखपत्र, कन्नड आवृत्ती, जैन बोर्डिंग हुबळी २५ एप्रिल १९९३ पृ. १६.

१८) स्व. प्रा. एस. एम. चौगले जैन समाजाचे कर्तबगार दिवंगत नेते, प्रस्तावना, प्रकाशन : दि. जै. बोर्डिंग, कोल्हापूर १९८८. पृ. १

१९) ग्रोव्हर बी. एल., ग्रोव्हर एस. 'आधुनिक भारताचा इतिहास' एस. चांद ॲण्ड कंपनी, दिल्ली, १९९७. पृ. ४९३.

२०) कित्ता, पृ. ३४४-३४६

२१) देसाई ए. आर. 'भारतीय राष्ट्रवादाची सामाजिक पार्श्वभूमी', पॉप्युलर प्रकाशन मुंबई, पुर्नप्रकाशित १९९६, पृ. २४०-२६०.

२२) डॉ. विलास संगवे, उपरोक्त, पृ. २६.

२३) श्री धनपाल हेरवाडे, उपरोक्त.

२४) सौ. ऋतुजा खोत, ए फिमेल एज्युकेशन इन जैन कम्यूनिटी, अप्रकाशित एम. फिल शोधनिबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,१९८९ पृ. १६.

२५) श्री. कर्मवीर धावते, सत्यवादी सभा अंक, 'जैन समाजाचा जीवंत पैसा', साप्ताहिक सत्यवादी प्रकाशन, सत्यवादी प्रेस दसरा चौक, कोल्हापूर, १४/१/१९३४, पृ. ६.

२६) सूर्यवंशी, कृ. गो. उपरोक्त, पृ. १४०.

२७) डॉ. विलास संगवे, उपरोक्त, पृ. २९-३८.

२८) दिगंबर जैन बोर्डींग कोल्हापूर हिरक महोत्सव स्मरणिका १९०५-६५, प्रकाशन दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूर, पृष्ठ ३८-४०.

२९) दक्षिण भारत जैन सभेची घटना, द. भा. जैन सभा सांगली. दुरूस्तीसह प्रकाशित, १९९८, पृ. १.